महाराष्ट्र राज्य
कला शिक्षण मंडळ, मुंबई
सर ज. जी. कला शाळा आवार, डॉ. डी. एन. रोड, फोर्ट,
मुंबई- ४०० ००१. फोन. नं. ०२२ २५१७२१६९/७०
Web: www.msbae.ac.in | Email: director.msbae@gmail.com

Maharashtra State
Board of Art Education, Mumbai
Sir J. J. School of Art compound, Dr. D. N. Road,
Fort, Mumbai- 400 001. Ph. No. 022 25172169 / 70
Web: www.msbae.ac.in | Email: director.msbae@gmail.com

क्रमांक-कशिमं/वार्षिक-२०२६/पाच/209 दिनांक 12 FEB 2026

# परिपत्रक

## शासकीय उच्चकला (वार्षिक) परीक्षा २०२६

कला परिसंस्थांची नोंदणी, विद्यार्थ्यांचे परीक्षा आवदेनपत्र व परीक्षा शुल्क
ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याबाबत...

महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळामार्फत दृककलेतील पदविका / प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या शासकीय उच्चकला (वार्षिक) परीक्षा २०२६ चे आयोजन करण्यात येणार आहे. त्यानुषंगाने, कला शिक्षण मंडळाची संलग्नता घेतलेल्या सर्व कला परिसंस्थांना कळविण्यात येते की, वार्षिक परीक्षेकरिता आपल्या कला परिसंस्थेची नोंदणी/माहिती अद्ययावत करण्याबाबतची कार्यवाही ऑनलाईन पध्दतीने मंडळाच्या https://mis.msbae.in या लिंकवर करण्यात यावी. सदर लिंक कला शिक्षण मंडळाच्या https://msbae.ac.in या संकेत स्थळावरील Higher Art Exam या टॅब अंतर्गत उपलब्ध आहे.

०२. कला परिसंस्थेची नोंदणी/माहिती अद्ययावत करण्याकरिता तसेच विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्र व परीक्षा शुल्क ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याकरिता कुलसचिव/अधिष्ठाता/प्राचार्य यांना त्यांच्या नोंदणीकृत ई-मेलवर गोपनीय युजरनेम व पासवर्ड पाठविण्यात येतील. प्राप्त होणारे युजरनेम व पासवर्ड परीक्षेच्या पुढील सर्व ऑनलाईन प्रक्रीयेकरिता गोपनियरित्या जतन करुन ठेवावेत. तसेच, युजरनेम व पासवर्ड द्वारे उपरोक्त लिंकवर लॉगिन करुन कला परिसंस्थेची नोंदणी/अद्ययावत माहिती सादर करावी. तद्नंतर आपल्या कला परिसंस्थेमधून उच्चकला परीक्षेस प्रविष्ठ होण्यास पात्र असणाऱ्या तसेच खालील निकष पूर्ण करण्याऱ्या विद्यार्थ्यांचे अभ्यासक्रमनिहाय परीक्षा आवेदनपत्रे व परीक्षा शुल्क ऑनलाईन पध्दतीने सादर करावेत.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | ऑनलाईन आवेदनपत्र सादर करण्याकरिता आवश्यक निकष/पात्रता |
|---|---|---|
| १ | मुलभूत | १) सदर अभ्यासक्रमामध्ये यापूर्वी अनुत्तीर्ण असलेले विद्यार्थी<br>२) पूनर्रप्रविष्ठ (Repeater) म्हणून सदर अभ्यासक्रमाच्या परीक्षेस प्रविष्ठ होण्याची ही अंतिम संधी असेल. |
| २ | कला शिक्षक प्रशिक्षण पदविका प्रथम वर्ष (Revised Course) | १) ए.टी.डी. प्रथम वर्षाच्या परीक्षेत ATKT निकाल असलेले द्वितीय वर्षाचे नियमित (Reguler) किंवा पूनर्रप्रविष्ठ (Repeater) विद्यार्थी<br>२) पूनर्रप्रविष्ठ (Repeater) म्हणून सदर अभ्यासक्रमाच्या परीक्षेस प्रविष्ठ होण्याची ही अंतिम संधी असेल. |
| ३ | कला शिक्षक प्रशिक्षण पदविका व्दितीय वर्ष (Revised Course) | १) नियमित ( Regular) विद्यार्थी<br>२) सदर अभ्यासक्रमामध्ये यापूर्वी अनुत्तीर्ण असलेले विद्यार्थी |

| | | |
|---|---|---|
| ४ | इंटरमिडिएट ड्रॉईंग ॲन्ड पेंटींग | १) नियमित ( Regular) विद्यार्थी<br>२) सदर अभ्यासक्रमास यापूर्वी ATKT निकाल असलेले तसेच अनुत्तीर्ण विद्यार्थी |
| ५ | इंटरमिडिएट अप्लाईड आर्ट | |
| ६ | इंटरमिडिएट स्कल्पचर ॲन्ड मॉडेलिंग | |
| ७ | डिप्लोमा ड्रॉईंग ॲन्ड पेंटींग | १) नियमित ( Regular) विद्यार्थी<br>२) सदर अभ्यासक्रमामध्ये यापूर्वी अनुत्तीर्ण असलेले विद्यार्थी |
| ८ | डिप्लोमा अप्लाईड आर्ट | |
| ९ | डिप्लोमा स्कल्पचर ॲन्ड मॉडेलिंग | |
| १० | डिप्लोमा टेक्सटाईल डिझाईन (प्रिंटींग ॲन्ड डाईंग व विव्हिंग) | |
| ११ | डिप्लोमा टेक्सटाईल डिझाईन (विव्हिंग) | |
| १२ | डिप्लोमा इंटेरियर डेकोरेशन | |
| १३ | कला शिक्षणशास्त्र पदविका | १) सदर अभ्यासक्रमामध्ये यापूर्वी अनुत्तीर्ण असलेले विद्यार्थी<br>२) पूनर्रप्रविष्ठ (Repeater) म्हणून सदर अभ्यासक्रमाच्या परीक्षेस प्रविष्ठ होण्याची ही अंतिम संधी असेल. |
| १४ | आर्ट मास्टर प्रमाणपत्र | १) चालू शैक्षणिक वर्षात ३ वर्ष कालावधीचा अभ्यासक्रम पूर्ण करत असलेले नियमित (Reguler) विद्यार्थी तसेच सदर अभ्यासक्रम अनुत्तीर्ण असलेले विद्यार्थी पूनर्रप्रविष्ठ (Repeater) विद्यार्थी<br>२) १ वर्ष कालावधीच्या अभ्यासक्रमामध्ये यापूर्वी अनुत्तीर्ण असलेले पूनर्रप्रविष्ठ (Repeater) विद्यार्थी. |

०३. विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्र ऑनलाईन पध्दतीने सादर करतांना विद्यार्थ्याचे पूर्ण नाव प्रथम आडनांव, नंतर स्वत: चे नाव व शेवटी वडील/पतीचे नाव या क्रमाने विद्यार्थ्याच्या नावाची नोंदणी करावी.

कला शिक्षक प्रशिक्षण पदविका- द्वितीय वर्ष अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्र ऑनलाईन सादर करतांना संबंधित विद्यार्थी प्रथम वर्षाच्या परीक्षेस यापूर्वी ज्या नावाने प्रविष्ठ झाला/झाली असेल त्याच नावाने द्वितीय वर्षाचे परीक्षा आवेदनपत्र सादर करावे.

कला परिसंस्थांचे कुलसचिव/अधिष्ठाता/प्राचार्य यांनी उच्चकला परीक्षेस प्रविष्ठ होण्यास पात्र असणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे अभ्यासक्रमनिहाय परीक्षा आवेदनपत्रे ऑनलाईन सादर केले असल्याची खात्री करावी. तसेच, कोणताही पात्र विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी.

०४. वरीलप्रमाणे पात्र विद्यार्थ्यांची परिपूर्ण आवेदनपत्रे ऑनलाईन सादर केल्यानंतर त्यांचे एकत्रित परीक्षा शुल्क ऑनलाईन भरण्याची सुविधा उपरोक्त लिंकद्वारे उपलब्ध करुन देण्यात आली आहे. नोंदणीकृत सर्व विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क ऑनलाईन भरल्यानंतर विद्यार्थ्यांचे बैठक क्रमांक व परीक्षा प्रवेशपत्र कुलसचिव/अधिष्ठाता/प्राचार्य यांच्या लॉगिनवर उपलब्ध करुन देण्यात येतील, याची सर्व कला परिसंस्थांनी नोंद घ्यावी.

०५. कला परिसंस्थेची नोंदणी, कला परिसंस्थेमार्फत विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्र व परीक्षा शुल्क ऑनलाईन पध्दतीने सादर करणे याकरिता पुढीलप्रमाणे कालावधी विहित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | तपशील | कालावधी |
|---|---|---|
| १ | कला परिसंस्थांनी ऑनलाईन पध्दतीने नोंदणी करणे. | दिनांक २०.०२.२०२६ ते २५.०२.२०२६ |
| २ | परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांची परीक्षा आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने सादर करणे. (कला परिसंस्थेमार्फत) | दिनांक २०.०२.२०२६ ते २८.०२.२०२६ |
| ३ | परीक्षा शुल्काचा ऑनलाईन भरणा करणे. (कला संस्थेमार्फत) | दिनांक २०.०२.२०२६ ते ०४.०३.२०२६ |

०६. कला परिसंस्थेची नोंदणी, विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्रे व परीक्षा शुल्क इत्यादी ऑनलाईन प्रक्रीया विहित कालावधीत पूर्ण होण्याच्या अनुषंगाने संबंधित कला परिसंस्थेचे कुलसचिव/अधिष्ठाता/प्राचार्य यांनी विशेष दक्षता घ्यावी. प्रस्तुत प्रकरणी संपूर्ण जबाबदारी कुलसचिव/अधिष्ठाता / प्राचार्य यांची राहील. परीक्षेचे सविस्तर वेळापत्रक, परीक्षेचे सर्वसाधारण स्वरुप इ. बाबतच्या सूचना स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

०७. महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाकडून परीक्षेसंदर्भात यापुढे निर्गमित करण्यात येणारी पत्रे, परिपत्रके व इतर परीक्षा विषयक माहिती उच्चकला परीक्षेच्या https://mis.msbae.in या लिंकच्या होमपेजवरील Notifications या टॅब अंतर्गत उपलब्ध करुन देण्यात येईल. त्यामुळे, सर्व संबंधितांनी उपरोक्त लिंकचे वेळोवेळी अवलोकन करावे.

(स्मिता किंकळे)
सचिव,
महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ,
मुंबई.

प्रति,

१) कुलसचिव, सर ज.जी. कला, वास्तुकला व अभिकल्प विद्यालय, मुंबई.
२) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपूर.
३) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर.
४) प्राचार्य, शासनमान्य अशासकीय कला परिसंस्था. (सर्व)

प्रत,

१) निरीक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) सहायक निरीक्षक, चित्रकला व शिल्प, विभागीय कार्यालय, नागपूर.
३) सहायक निरीक्षक, चित्रकला व शिल्प, विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर.
४) निवड नस्ती.